ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor: 5 . 3*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE - XXIV Year – 6 Dec. 2020**

**Editor in Chief**

**Mrs. Pallavi Laxman Shete**
Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)
Email: Shrishprakashan2009@gmil.com

**Director**

**Mr. Tejas Rampurkar**
(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence**

**Website: www.wiirj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,
Taroda (KH), Nanded – 431605
(India -Maharashtra)
**Email:** shrishprakashan2009@gmil.com
umbarkar.rajesh@yahoo.com
**Mob.No:** +91-9623979067

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

| | | | |
|---|---|---|---|
| 16. | दादाभाई नौरोजी यांचे विचारधन | डॉ. संभाजी संतोष पाटील | 102 |
| 17. | बालकामगाराच्या समस्या व कायदे | प्रा. डॉ. माया बी. मसराम | 108 |
| 18. | संत साहित्यातील मिथके : एक मनोवैज्ञानिक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. सायली योगेश आचार्य | 113 |
| 19. | मध्ययुगीन संत साहित्यातील विद्रोह | डॉ. सर्जेराव पद्माकर | 120 |
| 20. | भारतीय प्रशासनाची सुशासनाकडे वाटचाल | डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव | 127 |
| 21. | बालमनाचा उत्कट ठाव घेणारे 'गवतफूल' एक अभ्यास | प्रा.डॉ.राजीव यशवंते | 132 |
| 22. | भारत-नेपाळ संबंधातील वाढता तणाव आणि उपाय | प्रा.डॉ. दत्ता कुंचेलवाड | 135 |
| 23. | बौध्द धर्मातील मानवतावाद एक ऐतिहासिक विश्लेषण | सरस्वती निवृत्ती सोनाळे<br>डॉ.एस.जी.जाधव | 140 |
| 24. | परभणी जिल्ह्याचा ऐतिहासिक आढावा | रंजलकर विनिता विनोदराव<br>डॉ.एस.जी.जाधव | 145 |


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)



PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

# बालमनाचा उत्कट ठाव घेणारे 'गवतफूल' एक अभ्यास

प्रा.डॉ.राजीव यशवंते
श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालय, पुर्णा.

कवी प्रकाश प्रकाश अंभोरे हे नाव आता मराठी कवितेत नवखे राहिलेले नाही. त्यांचा 'शेतीशिवार', 'अद्‌भूत नगरी' आणि आता 'गवतफूल' या तीन काव्यसंग्रहाच्या रूपाने मराठी बालकवितेच्या दालनात भर घालणारे कवी म्हणून परिचित झालेले आहे. कवी प्रकाश अंभोरे यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहाने त्यांना बऱ्यापैकी नामांकित करून अनेक पुरसकारांनीही त्यांना सन्मानित केलेले आहे. कवी प्रकाश अंभोरे हे मराठवाड्यातील वसंतमते, मराठवाड्यालाही बालसाहित्याची मोठी परंपरा आहे. ना.धो.महानोर, दा.सू.वैद्य, सुरेश सावंत, पृथ्वीराज तौर अशा बाल साहित्यिकांनी मराठवाड्यातील बाल साहित्याचे दाल समृद्ध केलेले आहे. प्रकाश अंभोरे यांच्या कवितेने ह्या दालनात आणखीच भर घालून बालसाहित्याची परंपरा वृद्धिंगत करण्यासाठीचे हे त्यांचे पाऊल नक्कीच समर्थ आणि परंपरा जपणारे ठरेल यात शंका नाही. 'शेतशिवार', 'अद्‌भूतनगरी' आणि 'गवतफूल' ही त्यांची बालकवितेची संग्रहच याची पावती देतांना दिसतात.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने प्रकाश अंभोरे यांच्या 'गवतफूल' या बालकाव्याचाच केवळ विचार करण्यात आलेला आहे. त्यांच्या या काव्यसंग्रहात एकूण ४४ कवितांचा समावेश असून या काव्यसंग्रहात बालसुलभ मनातील भावविश्व चित्रित करण्यात कवी यशस्वी झाल्याचे समाधानही वाचक रसिकांना होत जाते. 'अद्‌भूतनगरी' या काव्यसंग्रहातून त्यांनी बालसुलभ मनाचा ठाव घेणारी कविता वाचक रसिकांना दिलेलीच आहे. परंतु 'गवतफूल' या काव्यसंग्रहात प्रतिकात्मक पातळीवरचा संवाद कवी मांडताना दिसतात. साधे प्रसंग कलात्मक पातळीवरून मांडल्यामुळेच खरेतर हीच या काव्याचे बलस्थाने म्हणता येईल. कारण भाषाही अवजड नाही. साध्या साध्या शब्द योजनेतून कवितेने मनमोकळा संवाद साधलेला आहे. चित्रकार प्रमोद दिवेकर यांच्या मुखपृष्णतेचं मुलांच्या भावविश्वातील कविने केलेली सफर अधोरेखित झालेली आहे. निसर्गाचा मनमुराद आनंद आणि त्यांच्या मनातील चंचलता यातून अधोरेखित होते. निसर्ग आणि निसर्गातील विविध रूपं चंचल मनाला प्रभावित करतात. निसर्गातील फुलपाखरांसमोवत बागडणारी मुलं सूर्यप्रकाशाच्या प्रसन्न वातावरणात मुलं शाळेला निघालेली आहेत. कवी शिक्षणाच्या संदर्भात म्हणतो, शिक्षण म्हणजे नीतिची घागर, संस्काराचा कुंभ, मूल्यांचा पाझर म्हणून शिक्षण महत्त्वाचे आहे. त्यांच्या कवितेत चित्रित झालेली नदीच्या पाण्याची झुळूझुळू वाहणारी धार, त्यातून उत्पन्न होणारे गीत, झाडाच्या वेलीला आलेला बहर, जणू काही धरती हिरवा, पोपटी शालू घालून नटलेली आहे. या जिवंत चित्रांमुळे 'गवतफूल' मधील कविता बालसुलभ मनाचा उत्कट भाव चिरतांनाच निसर्गचित्रांनाही ती उत्कटतेवर घेऊन जाते. मानवी जीवन आणि जीवनमूल्य यांची एकसंघता म्हणजेच 'गवतफूल' असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण त्यांच्या कवितेची भाषा सहज सुलभ आणि हेळकळ अनुभवांना अधोरेखित करणारी आहे. त्यांच्याच कवितेतून आलेली भाषा योजना/शब्दकळा अशी -

Co-ordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist.Parbhani

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# बालमनाचा उत्कट ठाव घेणारे 'गवतफूल' एक अभ्यास

**प्रा.डॉ.राजीव यशवंते**
श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालय, पुर्णा.

कवी प्रकाश प्रकाश अंभोरे हे नाव आता मराठी कवितेत नवखे राहिलेले नाही. त्यांचा 'शेतीशिवार', 'अद्‌भूत नगरी' आणि आता 'गवतफूल' या तीन काव्यसंग्रहाच्या रूपाने मराठी बालकवितेच्या दालनात भर घालणारे कवी म्हणून परिचित झालेले आहे. कवी प्रकाश अंभोरे यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहाने त्यांना बऱ्यापैकी नामांकित करून अनेक पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित केलेले आहे. कवी प्रकाश अंभोरे हे मराठवाड्यातील वसंतमते, मराठवाड्यालाही बालसाहित्याची मोठी परंपरा आहे. ना.धो.महानोर, दा.सू.वैद्य, सुरेश सावंत, पृथ्वीराज तौर अशा बाल साहित्यिकांनी मराठवाड्यातील बाल साहित्याचे दाल समृद्ध केलेले आहे. प्रकाश अंभोरे यांच्या कवितेने ह्या दालनात आणखीच भर घालून बालसाहित्याची परंपरा वृध्दिंगत करण्यासाठीचे हे त्यांचे पाऊल नक्कीच समर्थ आणि परंपरा जपणारे ठरेल यात शंका नाही. 'शेतशिवार', 'अद्‌भूतनगरी' आणि 'गवतफूल' ही त्यांची बालकवितेची संग्रहच याची पावती देतांना दिसतात.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने प्रकाश अंभोरे यांच्या 'गवतफूल' या बालकाव्याचाच केवळ विचार करण्यात आलेला आहे. त्यांच्या या काव्यसंग्रहात एकूण ४४ कवितांचा समावेश असून या काव्यसंग्रहात बालसुलभ मनातील भावविश्व चित्रित करण्यात कवी यशस्वी झाल्याचे समाधानही वाचक रसिकांना होत जाते. 'अद्‌भूतनगरी' या काव्यसंग्रहातून त्यांनी बालसुलभ मनाचा ठाव घेणारी कविता वाचक रसिकांना दिलेलीच आहे. परंतु 'गवतफूल' या काव्यसंग्रहात प्रतिकात्मक पातळीवरचा संवाद कवी मांडताना दिसतात. साधे प्रसंग कलात्मक पातळीवरून मांडल्यामुळेच खरेतर हीच या काव्याचे बलस्थाने म्हणता येईल. कारण भाषाही अवजड नाही. साध्या साध्या शब्द योजनेतून कवितेने मनमोकळा संवाद साधलेला आहे. चित्रकार प्रमोद दिवेकर यांच्या मुखपृष्णतेचं मुलांच्या भावविश्वातील कविने केलेली सफर अधोरेखित झालेली आहे. निसर्गाचा मनमुराद आनंद आणि त्यांच्या मनातील चंचलता यातून अधोरेखित होते. निसर्ग आणि निसर्गातील विविध रूपं चंचल मनाला प्रभावित करतात. निसर्गातील फुलपाखरांसमोवत बागडणारी मुलं सूर्यप्रकाशाच्या प्रसन्न वातावरणात मुलं शाळेला निघालेली आहेत. कवी शिक्षणाच्या संदर्भात म्हणतो, शिक्षण म्हणजे नीतिची घागर, संस्काराचा कुंभ, मूल्यांचा पाझर म्हणून शिक्षण महत्त्वाचे आहे. त्यांच्या कवितेत चित्रित झालेली नदीच्या पाण्याची झुळूझुळू वाहणारी धार, त्यातून उत्पन्न होणारे गीत, झाडाच्या वेलीला आलेला बहर, जणू काही धरती हिरवा, पोपटी शालू घालून नटलेली आहे. या जिवंत चित्रांमुळे 'गवतफूल' मधील कविता बालसुलभ मनाचा उत्कट भाव चितारतांनाच निसर्गचित्रांनाही ती उत्कटतेवर घेऊन जाते. मानवी जीवन आणि जीवनमूल्य यांची एकसंघता म्हणजेच 'गवतफूल' असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण त्यांच्या कवितेची भाषा सहज सुलभ आणि [illegible] अनुभवांना अधोरेखित करणारी आहे. त्यांच्याच कवितेतून आलेली भाषा योजना/शब्दकळा अशी -

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

"दूर दूर दूर जाऊ |

**दूर क्षितिजाच्या पार**

**पाहू मोकळे आकाश**

**होऊ वाऱ्यावर स्वार''[१] (पृ.क्र.१०)**

साध्या साध्या नैसर्गिक प्रसंगाना साध्या साध्या शब्दकलेने/भाषेने त्या अनुभवतांना शब्दबद्ध करतात. 'क्षितिजाच्या पार', 'वाऱ्यावर स्वार' या शब्दयोजनेतून कवी निसर्गातील सौंदर्य अनुभवांना आपल्या शब्दकलेतून आविष्कृत करतात. निसर्गाच्या सान्निध्यात असताना जीवनातील धावपळ सोडून समाधानाने पुढे जात निसर्गाचा आस्वाद घेतला पाहिजे. तसेच सांगा?' या कवितेत कवी विलोभनिय निसर्ग सौंदर्याला आविष्कृत करताना म्हणतो,

**''हिरव्या झाडांच्या | हिरव्या रांगा**

**भरभर कशा | पळतात सांगा?''[२] (पृ.क्र.२१)**

वरील कवितेतून कवी प्रवास करतानाचे विलोभनिय निसर्ग सौंदर्य रेखाटताना बालमनातील बालसुलभ मनाला पडलेल्या पडलेल्या प्रश्नासंबंधीचे कोडेच कवी चित्रित करताना दिसतो. निसर्गातील झाडे पळणे, घर, डोंगर, शेत, मळे, क्षितिज, भिरभिर पक्षी, नभातली सुंदर नक्षी या वरील शब्द योजनेतून बाल सुलभमनाला पडलेल्या प्रश्नांची जंत्रीच कवी उभी करताना दिसतो. खरोखरच वरील कवितेतील प्रश्न बालमनाला अनुत्तरीत करीत असतात. कारण बालमनाला विचाराची गरज नसते हे अनुभवाने अन् वाचनाने उत्तरोत्तर मानवी जीवन प्रगल्भतेकडे गेल्यावरच या सर्व प्रश्नांची उत्तरे त्या त्या वेळेला आपसूकच मिळतात.

बालमनाला पडलेल्या अनेक प्रश्नांची जंत्री कवी वेगवेगळया अनुभव विश्वातील प्रसंगरूपाने चित्रित करतात. अशा ह्या म्हाताऱ्या आत्याबाईचे चित्र रेखाटताना कवी बालमनातील आत्याबाईच उभी करतात.

**सखु आत्याबाई | कशी आहे बरे**

**नेहमी म्हणते | तिचेच खरे**

**कसेही विचारा | नाकावर राग**

**डोळयात जणू | भडकती आग[३] (पृ.क्र.२०)**

या कवितेतून मानवी जीवनातील मूल्य पडझडीच्या वास्तवाबरोबरच बालमनाला पडलेल्या कोड्याची उकलही कवी करताना दिसतो. मानवी जीवनातील उतरत्या वयात सारासार विचार करण्याची क्षमताच लयास जाते. हे वयपरत्वे त्यामागे नैसर्गिक शक्तीच कारणीभूत असते. पण त्या वयात माणसाला आपण काय अन् कसे वागतो याचे जवळपास भान हरपलेले असते. म्हणूनच बालमनाला अशा प्रसंगातून प्रश्न उभे राहतात याचे हे मार्मिक चित्रण कवीने प्रस्तुत काव्यातून केले आहे. कवी प्रकाश अभोरे यांच्या 'गवतफूल' मधील कवितेच्या शीर्षकावरूनही ही कविता निसर्ग आणि बालसुलभ मनाच्या ठवाबरोबरच निसर्ग सौंदर्याचा आविष्कार करणारी सक्षम कविता आहे. उदा. गोडी, नदी, दुर दुर, जाऊ, एकदा,



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd. 1963
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

८



सांग, झाड, रानात, ढगा, गळ्यात, सांगा?, अभ्यास, शेत, खोपा, माझे घर, गंमत करू, चिमणी, पाखरांचे घर, हिरवे गाणे, गवताच्या पात्या, फुलपाखरू, फुले, काजवा, शितलवारा, माझ्या अंगणात, पाऊस, हिरवे, हराळी, गवतफूल इत्यादी कविता याची साक्ष देतात.

'गवतफूल' मधील कविता निसर्ग आणि बालसुलभ मनातील विविध रूपांना आविष्कृत करण्यात ही कविता यशस्वी झालेली आहे. निसर्गातील साध्या साध्या अनुभवांना शब्दरूप देऊन कवी त्या अनुभवांना चित्रित करतात ते असे,

**'एकदा आले | ढगाला रडू**

**धो धो पाऊस | लागला पडू'[४] (पृ.क्र.२४)**

तीन ऋतुपैकी पावसाळ्यातल्या ऋतुमध्ये 'ढगाला आले रडू' अशा प्रतिमांमधून कवीने बालसुलभ मनातील तरल भाव साध्या साध्या शब्दकलेतून चित्रित केलेले आहे. कवी प्रस्तुत कवितेतून प्रतिमांच्या माध्यमातून त्या त्या अनुभवांना अधिक उत्कट पातळीवर नेताना दिसतात. 'गवतफूल' काव्यसंग्रहातील 'गवतफूल' शीर्षक असलेली कविता निसर्ग सौंदर्याचा अधिक तरलभाव संवेदनेचा उत्कृष्ट नमूना म्हणून या कवितेकडे पाहता येईल. 'गवतफूल' या प्रतिमेमधून निसर्गातील सौंदर्यांबरोबरच बालसुलभ मनातील भावनांनाही कविने अधिक उत्कट पातळीवर कवीने नेलेले आहे. कवी प्रकाश अंभोरे यांच्या 'गवतफूल' या काव्यसंग्रहातून विविध प्रतिमांच्या माध्यमातून कवीने अधिक उत्कट पातळीवर पोहोचवलेले आहे. उदा. प्रकाशात न्हाले, सुरात भिजला, सोनेरी झूल, संस्काराचा कुंभ, नीतिची घागर, सोनेरी शिवार, घामाने पिकवू, माणिकमोती, भडकती आग, हिरव्या रांगा, क्षितिज घाट, चिमुकले रोप, कणीस टपोरे, फुटके नशीब, गर्द छाया, सोन्याची खाण, हिरवे गाणे, फुलांची मने, रेशीमवाती, उभी चंद्रकोर, पाखरांचं भजन, विजेचं बळ, सप्नफुलले, हिरव्या मनात, अशा कितीतरी प्रतिमांमधून कवीने निसर्ग आणि बालसुलभ मनातील उत्कट भाव प्रतिमांच्या माध्यमातून अधिक गाहेरे तरलतेकडे नेताना दिसतात. सदरील काव्यसंग्रहाचा अभ्यास करत असताना काही प्रमुख निष्कर्षांची नोंद खालीलप्रमाणे :-

**निष्कर्ष :**

१.कवी प्रकाश अंभोरे यांची कविता निसर्ग व बालसूलभ मनातील भावचित्रित करण्यात यशस्वी झालेली आहे.

२.'गवतफूल' मधील कविता साध्या साध्या शब्दकलेतून सहजसोप्या भाषेत आविष्कृत झालेली आहे.

३.'गवतफूल' मधील कविता ही उमेद जागवणारं निसर्गचित्र म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

४.'गवतफूल' हे काव्य बालसुलभ मनाचा ठाव घेणारे काव्य आहे असे म्हटले तरी अतिशयोक्त ठरणार नाही.

**संदर्भ :**

१.अंभोरे प्रकाश, 'गवतफूल', इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, २००१९, पृ.क्र.२०.

२.तत्रैव, 'गवतफूल', पृ.क्र.२०.

३.तत्रैव, 'गवतफूल', पृ.क्र.२१.

४.तत्रैव, 'गवतफूल', पृ.क्र.२४.

Co-ordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd. 1983

PRINCIPAL Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist.Parbhani


ISSN 0971-6955

# आमची श्रीवाणी

संयुक्त अंक

वर्ष : २६, अंक १, ऑक्टो. २०१८ – जाने. २०१९
अंक २, फेब्रु. – मे २०१९

## मराठी वाङ्मयेतिहास : नवे दृष्टिकोन
विशेषांक



# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| * | संपादकीय | |
| १. | मराठी वाङ्मयाचा इतिहास : पुनर्रचनेचा पेच<br>- उमेश बगाडे | १ |
| २. | मराठी साहित्य समीक्षा आणि वाङ्मयेतिहास<br>- नागनाथ कोत्तापल्ले | ११ |
| ३. | फुले-आंबेडकरांच्या दृष्टीने वाङ्मयेतिहास लेखन<br>- प्रल्हाद लुलेकर | २३ |
| ४. | फुले आंबेडकरवादी इतिहास लेखन पद्धती<br>- नीळकंठ शेरे | ३३ |
| ५. | मराठी वाङ्मयाचा इतिहास : काही निरीक्षणे<br>- वंदना महाजन | ४० |
| ६. | सत्यशोधनाच्या आधारे इतिहासाचे पुनर्लेखन: पुनरुज्जीवनवादी शक्तींना आवाहन<br>- लता प्रतिभा मधुकर | ४५ |
| ७. | इतिहासाचे-वाङ्मयेतिहासाचे तत्वज्ञान व साधनांचा मागोवा<br>- प्रभाकर देसाई | ५६ |
| ८. | स्त्रीवाद : इतिहास लेखनपद्धती<br>- शोभा शिंदे | ७६ |
| ९. | मराठी नाटकाचा इतिहास<br>- पुष्पलता राजापुरे - तापस | ८० |
| १०. | मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहास लेखनदृष्टी<br>- केदार काळवणे | १०३ |
| ११. | मराठी ललित गद्याचे ऐतिहासिक अवलोकन<br>- दत्ता घोलप | ११२ |
| १२. | वाङ्मयेतिहासाकडे पाहण्याचा भाषावैज्ञानिक दृष्टिकोन<br>- अलका मटकर | ११९ |
| १३ | आदिवासी साहित्यातील ऐतिहासिकता<br>- वैजनाथ अनमुलवाड | १२६ |
| १४. | महात्मा फुले आणि ग्रामीण साहित्येतिहास<br>- राजीव यशवंते | १३९ |
| १५. | मराठी ग्रामीण साहित्येतिहास लेखनाचे नवे दृष्टिकोन<br>- विठ्ठल हरिभाऊ जंबाळे | १४४ |
| १६. | आधुनिक मराठी बालसाहित्याचा इतिहास: नवे दृष्टिकोन<br>- पृथ्वीराज तौर | १४८ |
| १७. | मराठी विज्ञान कथेचा इतिहास: नवे दृष्टिकोन<br>- वंदना लव्हाळे | १५४ |



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd.1969

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

असेल तरच आतील
विनिर्मितीला गती प्राप्त
नसेल तर सर्वकाही

दिवासी वाङ्मयाचा
र नव्याने विचार
.

साची मांडणी फुले-
नवादी दृष्टिकोनातून
हे.

कालीन आदिवासी
तून घेऊन पुनर्लेखन

दिवासी साहित्याने
संशोधनमूल्यांची व
श्यक आहे.

द ही आदिवासी
ढीच्या लेखकांनी

तंत्रज्ञानाचा अंतर्भाव
क प्रमाणावर होणे

यातील ऐतिहासिकता



# महात्मा फुले आणि ग्रामीण साहित्येतिहास

- राजीव यशवंते

**प्रास्ताविक :**

ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष चित्रण ज्या साहित्यातून झाले अशा साहित्याचा शोध घेत आपणांस थेट ज्ञानेश्वर कालापर्यंत जावे लागते. त्या अगोदरही 'दृष्टान्तपाठा' मधून आलेल्या काही कथांमधून शेती आणि शेतकरी आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण नकळत का होईना झाले हे आपल्या लक्षात येते. 'अधारिये परिसाचा दृष्टांत' हे त्याचे उत्तम उदाहरण. याच पद्धतीने नामदेव, एकनाथ, संत सावतामाळी, संत तुकाराम आदी संतांच्या अभंगातून ग्रामीण जीवनाची छटा प्रकट होताना दिसते. शाहीरी वाङ्मयातून तर ग्रामीण भावभावना प्रकट होताना दिसतात.

ग्रामीण साहित्याचा विचार करताना १९२० पूर्वीच्या वाङ्मयाचा निर्देश केला जात नाही. केला तरी हरिभाऊ आपटे यांनी लिहिलेल्या 'काळ तर मोठ कठीण आला' या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कथेचा निर्देश केला जातो. तसेच ही कथा अपघाताने लिहिली गेली असेही म्हणतात. महात्मा फुले यांच्या कालखंडात म्हणजेच अठराव्या शतकात ग्रामीण जीवनासंबंधीची स्वतंत्र जाणीव उदयाला आली आहे. ही जाणीव शेतकरी, समाज, स्त्रिया, ब्राह्मणांची गुलामगिरी, अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, जातीयव्यवस्था या संबंधीची ही जाणीव साहित्यातून प्रकट होत होती. या वैचारिक गद्य वाङ्मयाचा विचारही कोणी लक्षात घेतला नाही. या जाणीवेचा प्रारंभ महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड' व 'तृतीयरत्न' यासारखे महत्वाचे नाटक व फुले यांनी लिहिलेले अखंड या ग्रामीण साहित्य चळवळीच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. कारण महात्मा फुले हेच ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी आहेत.

इंग्रजी राजवटीनंतर एकूण समाजजीवनात मोठ्या प्रमाणात बदल सुरू झाले. औद्योगिकीकरणाचे परिणाम जाणवू लागले. या सगळ्या बाबींचा परिणाम येथील कृषिजीवनावर, ग्रामीण जीवनावर झाल्याचे दिसते. शेतसारा वाढीमुळे ग्रामीण जीवनात ज्याप्रमाणे अनेक प्रश्न निर्माण झाले त्याचप्रमाणे दुष्काळामुळेही येथील ग्रामीणजीवन होरपळून निघू लागले होते. त्याच भरीला भर म्हणून नव्याने आलेली कार्यालये आणि न्यायदानाच्या पद्धती शेतकऱ्याला जाचक होऊ लागल्या. धर्माच्या निमित्ताने होणारे शोषण तर पूर्वीपासूनच होते. या सगळ्यांच्या प्रतिक्रिया अतिशय रोखठोकपणे महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटल्या.

महात्मा फुले यांचे लेखन म्हणजे ग्रामीण साहित्याचा पहिला आणि शेवटचा सशक्त आविष्कार होय. महात्मा फुले यांनी प्रारंभी लिहिलेल्या 'तृतीय रत्न' (१८५५) या नाटकामधून शेतकऱ्यांचे धर्माच्या माध्यमातून कसे शोषण होते याचे चिंतन केले आहे. पथनाट्याच्या धर्तीवर लिहिलेले हे नाटक शेतकऱ्यांसाठी एक नवा मार्ग दिग्दर्शित करते हा मार्ग म्हणजे शिक्षणाचा, शिक्षणाशिवाय बहुजनांचा उद्धार नाही याची जाणीव तर त्यांनी सततच व्यक्त केली आहे. बहुजनांच्या जाणिवा विकसित करण्यासाठी बहुजनांची अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी आणि दांभिक धर्माचे गारूड उघड करून दाखविण्यासाठी त्यांनी 'अखंड' लिहिले आहेत. हे संपूर्ण अखंड केशवसुतांच्या आधी लिहिलेले आहेत. आधुनिकतेची अनेक मूल्ये त्यांनी आपल्या कवितेतून स्वीकारलेली आहेत आणि ती प्रभावीतपणे प्रकटही केली आहेत. त्यातील काही अखंड तर चिंतनशील काव्य म्हणून लक्षणीय आहेत. उदा. 'सत्य सर्वांचे आदि घर। सर्व धर्मांचे माहेर।।



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd. 1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| * | संपादकीय | |
| १. | मराठी वाङ्मयाचा इतिहास : पुनर्रचनेचा पेच<br>- उमेश बगाडे | १ |
| २. | मराठी साहित्य समीक्षा आणि वाङ्मयेतिहास<br>- नागनाथ कोत्तापल्ले | ११ |
| ३. | फुले-आंबेडकरांच्या दृष्टीने वाङ्मयेतिहास लेखन<br>- प्रल्हाद लुलेकर | २३ |
| ४. | फुले आंबेडकरवादी इतिहास लेखन पद्धती<br>- नीळकंठ शेरे | ३३ |
| ५. | मराठी वाङ्मयाचा इतिहास : काही निरीक्षणे<br>- वंदना महाजन | ४० |
| ६. | सत्यशोधनाच्या आधारे इतिहासाचे पुनर्लेखन: पुनरुज्जीवनवादी शक्तींना आवाहन<br>- लता प्रतिभा मधुकर | ४५ |
| ७. | इतिहासाचे-वाङ्मयेतिहासाचे तत्त्वज्ञान व साधनांचा मागोवा<br>- प्रभाकर देसाई | ५६ |
| ८. | स्त्रीवाद : इतिहास लेखनपद्धती<br>- शोभा शिंदे | ७६ |
| ९. | मराठी नाटकाचा इतिहास<br>- पुष्पलता राजापुरे - तापस | ८० |
| १०. | मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहास लेखनदृष्टी<br>- केदार काळवणे | १०३ |
| ११. | मराठी ललित गद्याचे ऐतिहासिक अवलोकन<br>- दत्ता घोलप | ११२ |
| १२. | वाङ्मयेतिहासाकडे पाहण्याचा भाषावैज्ञानिक दृष्टिकोन<br>- अलका मटकर | ११९ |
| १३ | आदिवासी साहित्यातील ऐतिहासिकता<br>- वैजनाथ अनमुलवाड | १२६ |
| १४. | महात्मा फुले आणि ग्रामीण साहित्येतिहास<br>- राजीव यशवंते | १३९ |
| १५. | मराठी ग्रामीण साहित्येतिहास लेखनाचे नवे दृष्टिकोन<br>- विठ्ठल हरिभाऊ जंबाळे | १४४ |
| १६. | आधुनिक मराठी बालसाहित्याचा इतिहास: नवे दृष्टिकोन<br>- पृथ्वीराज तौर | १४८ |
| १७. | मराठी विज्ञान कथेचा इतिहास: नवे दृष्टिकोन<br>- वंदना लव्हाळे | १५४ |



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

शेतकऱ्यांच्या जीवनासंबंधी त्यांनी लिहिलेले काही अखंड महत्त्वाचे आहे. उदा. 'कुळंबीण' या अखंडामधून शेतकऱ्याची पत्नी किंवा शेतीत राबणारी स्त्री किती अपरिमित कष्ट करते याचे त्यांनी रेखाटलेले चित्र हे अतिशय परिणामकारक आहे.

'कोंबडा आरवत होता प्रात:काली।
बसे जाती पाळी। शूद्रगायी।।
गाव्याचा धिंगाणा भ्रतार उठतो।
बईलास नेतो चरावया।।
अर्णोदय होतांकरी शेतकूट।
नाही पाट्यावार। केरासह।।
धूर्त आर्य तिला म्हणे कुळंबीन।
गुणाचे कमीन। जोती म्हणे।।

असे एकूण १३ अखंड आहेत. या अखंडामधून ग्रामीण स्त्रीची उद्योगप्रियता, तिचे दारिद्र्य, तिची होणारी कुतरओढ आणि तिच्या वाट्याला येणारी अवहेलना यांचे चित्रण महात्मा फुले यांनी फार प्रभावीपणे रेखाटले आहे. अर्थात धर्माच्या निमित्ताने होणारे शोषण हे महात्मा फुले यांना महत्त्वाचे वाटल्याने त्याचा संदर्भ अखंडामधून येते.

बदलत्या समाजव्यवस्थेत आणि अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांचे आणि येथील कष्टकऱ्यांचे होणारे शोषण महात्मा फुले यांचा कायमच चिंतनाचा आणि कार्याचा केंद्रबिंदू राहिलेला आहे.

'शेतकऱ्याचा असूड' हा छिन्न-भिन्न होणाऱ्या कृषी जीवनासंबंधीचा असंतोष आणि आक्रोश व्यक्त करणारा ग्रंथ आहे. शेतकऱ्यांचे सर्व बाजूंनी होणारे शोषण त्याचे दारिद्र्य आणि दयनिय अवस्था त्यांनी परिणामकारकपणे रेखाटली आहे. शेतीच्या अभ्युदयासाठी काय करता येईल, यासंबंधीचे काही उपायही त्यांनी सूचविले आहेत. शेतकऱ्यासंबंधीची, शेती संबंधीची आणि ग्रामीण जीवनाला प्राप्त झालेल्या दुरावस्थेच्या संबंधीची जाणीव प्रथमत: मराठीमध्ये महात्मा फुले यांनी प्रकट केली.

महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक विचारांचे कार्यकर्ते खेडोपाडी हिंडून जशी जनजागृती करीत असत त्याचप्रमाणे जनजागृतीसाठी 'सत्यशोधक जलसे' ही सादर करीत असत. या जलशामधून प्रामुख्याने शेतकऱ्यांची दु:स्थिती आणि त्यांचे शोषण करणाऱ्यांविषयीची अप्रिती, एका उठावाची भावना व्यक्त केली जात असे. पुष्कळदा शेतकरी आणि ऐतखाऊ पुराणिक यांची तुलनाही व्यक्त केली जात असे. यातील पुष्कळ गीते आजही खेडोपाडी विखुरलेली आहेत.

'गुलामगिरी' या ग्रंथाचे शीर्षक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रंथाची अर्पण पत्रिकाही ग्रंथाइतकीच महत्त्वाची आहे. 'युनायटेड स्टेट्स' येथील सदाचारी लोकांनी गुलामांना दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरपेक्षता व परोपकार बुद्धी दाखविली यास्तव त्यांच्या स्मरणार्थ महात्मा फुले यांनी आपला 'गुलामगिरी' हा ग्रंथ अर्पण केला व अशी आशा आपल्या देशबांधवांबद्दल व्यक्त केली की, माझे देशबांधव त्यांच्या त्या स्तुत्य कृत्याचा किता गिरवतील आणि आपल्या शूद्रबांधवांस ब्राह्मण लोकांच्या दास्यातून मुक्त करतील.'[१]

भारतातील शूद्रादी अतिशूद्रांची जी गुलामगिरी आहे ती अमेरिकेतील गुलामगिरीपेक्षा अधिक अमानुष आणि भयानक असल्याचे फुले यांनी स्पष्ट केले आहे. जगातील सर्व माणसे सारखी आहेत त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा फरक नाही असा महात्मा फुले यांना विश्वास होता. सर्व मानवांची निर्मिती ही निर्मिकाने केली आहे. म्हणूनच फुले म्हणतात की, 'सर्वांचा निर्मिक हा एकच आहे'. गुलामगिरी या ग्रंथातील शेवटच्या प्रकरणात धोंडीबा फुले प्रश्न विचारतात की, यास्तव आपण या भटांच्या कृत्रिम धर्माचा धिक्कार करून आपल्या अज्ञानी बांधवास जागे का करीत नाही.'[२]



Co-ordinator
IQAC
Buddhiswami Mahavidyalaya
Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

शामराव कुलंट यांनी जे नवग्रह शेतकऱ्यांच्या राशीला लागलेले आहेत त्यामध्ये 'पहिला ग्रह तो ब्राह्मण, दुजा ग्रह तो मारवाडी' असे म्हणून ते भोळ्या शेतकऱ्यांना कसे पाडतात याचे वर्णन केले आहे. 'हल्लीचे ब्राह्मण रांडेबरोबर। सुखे व्यभिचार करिताती।। हल्लीचे ब्राह्मण असत्य बोलती। सुखे धन खाती हरामाचे।।' अशा शब्दांत त्यांनी ब्राह्मणांचे चित्र रेखाटलेले दिसते. अशी कवने ऐकल्यावर श्रोते प्रक्षुब्ध होत असत. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे सत्यशोधकी जलसा झाल्यानंतर त्याचा परिणाम कसा झाला याचे वर्णन करणारे 'एका बार्सीकराचे पत्र' केसरीने २२ मे १९२३ च्या अंकात छापलेले आढळते. या तमाशात असा एक परिणामकारक गुण आहे की, तमाशा पाहिल्याबरोबर दुसरे दिवशी ब्राह्मणेत्तर ब्राह्मणास शिव्या देऊ लागले.

ब्राह्मणांचा न्हावी, परीट बंद झाला, महार सरपण फोडीत नाहीत, ब्राह्मणांचे कोणी मेल्यास सरणही स्वत: नेल्याशिवाय गती नाही. एखादे जनावर मेल्यास ते ही ब्राह्मणास न्यावे लागते. ब्राह्मणांच्या बायकांस पाणी भरण्यास पंचायत पडली आहे या योगाने बायकांच्या अब्रुवरही काही वेडावाकडा प्रसंग येतो की काय अशी भीती वाटते. शेतातील पिके काढण्यास मजूर न मिळाल्यामुळे हजारों रुपयांचे नुकसान झाले आहे. तवळडे येथे एक लिंगायत माळी ब्राह्मणाच्या घरी नोकरीस होता. त्याने बंदी मानली नाही म्हणून गाढवावरून त्याची धिंड काढली. सत्यशोधकी जलशात गायल्या जाणाऱ्या पदांमध्ये ब्राह्मण व मारवाडी स्त्रियांवर जी अभद्र टीका केली जात असे तिचा जाहीर निषेध काही सत्यशोधकांना करावासा वाटला.

यावरून आपल्या असे लक्षात येते की, महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून सत्यशोधक चळवळ सुरू झाली त्यातूनच कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील यांसारखे लेखक निर्माण झाले.

कृष्णराव भालेकर यांनी काव्यलेखनही केले. विशेषत: 'शेतकऱ्यांचे मधुर गायन', 'रघु गाडीवानाचा पोवाडा' यासारखी कविता त्यांची लक्षणीय आहे. विशेषत: सरकारच्या अंधाधुंद कारभारावर त्यांनी 'रघुगाडीवाला' च्या पोवाड्यातून फटके ओढलेले दिसतात. मोलमजुरी करणाऱ्या गाडीवानाची पोलिसांकडून कशी फरफट होते याचे फार प्रभावी चित्रण येते.

१८७७ मध्ये 'दीनबंधु' या नियतकालिकांमधून त्यांनी 'बळीबा पाटील' ही कादंबरी लिहिली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली पहिली कादंबरी म्हणून नोंद घेता येते. या कादंबरीमधून महात्मा फुले यांची अन्वेषणदृष्टी सतत प्रत्ययाला येते. महात्मा फुले ज्याप्रमाणे पुराणकथांचा उपहास करतात, सगळ्या पुराण कथांमधून पुरोहितवर्गाचे हितसंबंध जोपासले गेले आहेत हे सांगतात. तीच दृष्टी भालेकरांच्या या कादंबरीतून स्वीकारण्यात आली आहे.

'बळीबा पाटील' हे एक सोंग रूपक आहे. बळीबा पाटील यांचे गाव कोणते तर 'कुटाळ', तालुका 'उदास', जिल्हा 'कष्टपूर' असे त्यांनी सांगितले आहे. इलाखा 'अज्ञान' असल्याचाही ते निर्देश करतात. ९५ वर्षांचा बळीबा पाटील अतिशय समंजस आणि निर्व्यसनी आहे. त्याने एक बैठक बोलावली आहे. त्यात मुसलमान, महार इत्यादी व्यक्ति बोलावल्या आहेत. स्त्रियाही आपली बाजू मांडत आहेत असे चित्रित केले आहे. या कादंबरीला फारसे कथानक नाही, परंतु बैठकीमध्ये जी चर्चा होते ती जातीभेदावर व ग्रामीण माणसाच्या शोषणावर. यावरून सत्यशोधक समाजाला अपेक्षित असणारे विचार आणि एकूण समाजाचे समताधिष्ठित स्वरूप येथे ध्वनित करण्यात आले आहे.

मुकुंदराव पाटील यांनी 'दीनमित्र' हे नियतकालिक अनेक वर्षे चालवले. त्यांनी विविध प्रकारचे लेखन केले आहे. 'ढढ्ढा शास्त्री पराङ्गे', 'होळीची पोळी' यासारख्या त्यांच्या कादंबऱ्यांचा रोख उपेक्षित समाजाला कसे



Co-ordinator
IQAC
Buddhiswami Mahavidyalaya
... 431511 (M.S.)
Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

लुबाडले जाते हा आहे. 'ढढ्ढा शास्त्री पराने' ही कादंबरी अधिक लक्षणीय ठरते. कारण सतराव्या-अठराव्या शतकातील कुणी शास्त्री पुन्हा एकोणिसाव्या शतकात पुण्यात अवतरतो आणि त्याला सगळेच बदललेले दिसते. बदललेले जग आणि पारंपरिक मनोवृत्ती यांच्या विसंवादातून हास्य निर्माण होते. त्यांचा 'कुलकर्णी लीलामृत' हा विडंबन काव्यग्रंथही त्या काळात बहुचर्चित होता. हे ग्रंथ ग्रामजीवनातील उपेक्षितांच्या दु:स्थितीचा आणि शोषणाचा आलेख मांडणारे आहे. बहुजनांना जागृत करण्याच्या प्रेरणेने हे लेखन झाले आहे हे लक्षात येते.

**समारोप :**

ग्रामीण जीवन चित्रणाकडे ग्रामीण लेखक वळला पण वरती उल्लेख केलेल्या महात्मा फुले यांची प्रेरणा ग्रामीण साहित्य चळवळी निर्माण होण्यामागे होती असे सर्वानुमते जरी लक्षात येत असले तरी त्या प्रेरणा व मूल्यांचे, विचारांचे प्रतिबिंब मराठी ग्रामीण साहित्यात अत्यंत क्षीण स्वरूपात १९७० नंतर झाल्याचे दिसते. महात्मा फुले यांनी मांडलेले विषय त्यांनी सोडविलेले स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक प्रबोधन, वैचारिक लेखन या सर्व गोष्टी ग्रामीण साहित्यात अधोरेखित होणे अपेक्षित आहे. त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब साहित्यात उमटले तरच ग्रामीण साहित्याची प्रेरणा ही महात्मा फुले हे ठरतील. कारण सत्यशोधक चळवळ जर १९२५ नंतरची कार्यरत राहिली असती तर मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ ही चळवळीचे साहित्य राहिले असते.

*****



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani